Date : 10th oct. '14.
to
12th oct. '14.

धकाधकीचं शहरी जीवन
ट्रॅफीक जॅम नि ध्वनी प्रदूषण
विसरण्यास अनेक ताण
हवेसे वाटतात निवांत क्षण

गजबजाटातून दूर दूर
निसर्गासमीप हवाहवासा एकांत
स्वप्न साकार जाहले - पाहताच एकांत!
सुखावला जीव जो, शहरी होता कलान्त.

लाल मातीचे वळण, प्रसन्न, सोनेरी वातावरण
हिरव्या रंगांची उधळण, पक्ष्यांचे मधुर गान
चौफेर वृक्ष नि वृक्ष -- मधूनच दिसणारे मचाण
शीतल चांदणं नि वाऱ्याची तान, आनंदा आले
उधाण!

कुटीर असो वा बंगला,
स्वच्छते मुळे - वाटला आगळा वेगळा
वक्तशीर कामे, टापटीप, आपुलकी
यामुळे कर्मचारी वर्ग - वाटला मुलखावेगळा
तरीही आपला --

सागर, सुरेश, आश्विनी, किरण
नावे सर्वांची नाते सांगतात निसर्गाशी
कधीच नाही कधी लोऊन जातात - ती जिव्हाळ्याची।
सागराची साथ - प्रत्येक कामात
सुरेश, आश्विनी - जादू त्यांच्या हातात
त्यांच्या भोजना मुळे मिळे वेगळीच तृप्ती
वेगळे काय सांगावे - नि किती वर्णावी महती.
शेवटी एकच सांगणे अंतरीचे - नि अंती
पुन्हा पुन्हा करावी वाटे 'एकांत' भ्रमंती.

श्री व सौ. इंगळे परिवारास अनेक
शुभेच्छा.

सौ. शोभा भाटलेकर
श्री. भास्कर भाटलेकर } पुणे.